दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २८२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.५ जानेवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

नवीन कोरोनाचे रुग्ण आढळल्याने अधिक दक्षता घ्या : मुख्यमंत्री

परदेशातून अन्य राज्यांमार्गे येणाऱ्या प्रवाशांच्या विलगीकरणाबाबत केंद्राला विनंती करणार

दै.रायगड नगरी । मुंबई

ब्रिटनमधील नव्या कोरोना विषाणूमुळे राज्यात अधिक दक्षता घेतली जात असली तरी परदेशातून अन्य राज्यात उतरून तेथून महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या प्रवाशांचा ओघ लक्षात घेता अशा प्रवाशांना ते उतरतील त्या विमानतळांवरच क्वारंटाईन करण्याची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येणार आहे. वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना लसीकरणाचा आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी यासंदर्भात मुख्य सचिवांना निर्देश दिले.

ब्रिटनमधून परतलेल्या महाराष्ट्रातील ८ प्रवाशांमध्ये नवीन कोरोनाची लक्षणे आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर अधिक दक्षता घेण्याचे

निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यंत्रणांना दिले. यावेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे व टास्क फोर्सचे डॉ. शशांक जोशी दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

कोरोना लसीकरणाचा ड्रय रन नुकताच झाला. आता केंद्र शासनाकडून लस मिळाल्यानंतर प्रत्यक्षात लसीकरणाला सुरूवात होईल. त्याबाबतच्या तयारीचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. मुख्यमंत्री श्री.ठाकरे यावेळी म्हणाले, ब्रिटनमधून थेट मुंबईत उतरलेल्या प्रवाशांना नियमाप्रमाणे विमानतळावरून संस्थात्मक विलगीकरणात पाठविण्यात येते मात्र, गेल्या काही दिवसांपासून असे निदर्शनास आले आहे की, इतर राज्यातील विमानतळांवर उतरून प्रवासी देशांतर्गत प्रवास करून महाराष्ट्रात येतात. त्यामुळे त्यांचा मागोवा काढणे शक्य होत नाही. केंद्र सरकारने अशा परदेश प्रवास करून आलेल्यांना त्या-त्या विमानतळांवरून क्वारंटाईन करावे, असे श्री.ठाकरे यांनी सांगितले.

लसीकरणाच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले की, लसीकरणानंतर त्याचे काही दुष्परिणाम झाल्यास त्यावरील उपचाराची पूर्वतयारी ठेवा. उपचार करणाऱ्या डॉक्टरांना मार्गदर्शनासाठी टास्क फोर्ससारखी यंत्रणा तयार करावी. आरोग्य संस्थांमध्येच लसीकरण करावे, अशा सूचनाही श्री.ठाकरे यांनी यावेळी केल्या. यावेळी मुंबई महापालिकेचे आयुक्त आय. एस. चहल, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी लसीकरणाच्या तयारीचे सादरीकरण केले.

बैठकीस मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशीष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे,वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरव विजय, मुंबई महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त सुरेश काकाणी, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. तात्याराव लहाने आदी उपस्थित होते.

संक्षिप्त...

बीएमसीकडून ताज हॉटेलला तब्बल नऊ कोटी रुपये दंड माफ

दै.रायगड नगरी । मुंबर्द

मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर कुलाबा येथील ताज आणि नरीमन पॉइंट परिसरातील ट्रायडंट हॉटेलच्या बाहेरील रस्ते आणि पदपथ सुरक्षेच्या कारणामुळे पोलिसांनी बंद केले होते. गेल्या काही वर्षांत ताज हॉटेलने बंद केलेल्या पदपथांवर झाडाच्या कुंड्या, तसेच आपले काही साहित्य ठेवून अतिक्रमण केले. त्यामुळे पालिकेने रस्ते आणि पदपथाच्या व्यावसायिक वापरापोटी हॉटेलला ८ कोटी ८५ लाख रुपये दंड ठोठावला होता. गेली पाच वर्षे सुरू असलेल्या या वादावर अखेर दंडमाफी करून पालिकेने पडदा टाकला. 'ताज'ने आतापर्यंत ६६ लाख रुपयांचा भरणा केला आहे.

ताजच्या दंडमाफीचे प्रकरण सुरू असताना, 'बीएसई'च्या दंडात्मक कारवाईचा वाद सुरू झाला. १९९२ च्या बॉम्बस्फोटानंतर बीएसईच्या बाहेरील पदपथ आणि पार्किंग पोलिसांनी बंद केले. २६/११ नंतर २०१२ पासून ताज व ट्रायडंटपाठोपाठ 'बीएसई'लाही सार्वजनिक जागा व्यापल्याबद्दल दंडात्मक कारवाईच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. बीएसईला दरमहा भाड्यापोटी दोन लाख १२ हजार याप्रमाणे चार कोटी रुपये दंड, तसेच १५ टक्के व्याजापोटी ६० लाखांहून अधिक रक्कम भरण्यास सांगण्यात आली होती. नंतर हिशेबात गोंधळ झाल्याचे स्पष्ट करून, दोन कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला. 'बीएसई'ने या प्रकरणी पालिकेला पत्र पाठवून सुरक्षेच्या कारणास्तव बाहेरील पार्किंग व मोकळी जागा पोलिसांनी बंद केली आहे.

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी त्यांचे पनवेल नगरीत स्वागत केले.

खेलो इंडियाच्या माध्यमातून केंद्र शासनाने राज्य शासनाला भरीव निधी उपलब्ध करून द्यावा : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

मागील वर्षी खेलो इंडिया च्या माध्यमातून भरविण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याने अव्वल स्थान पटकाविले असून केंद्र शासनाने या वर्षी महाराष्ट्र राज्यासाठी भरीव निधीची तरतूद करावी, अशी मागणी क्रीडा राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केली.

खोपोली येथे कुस्ती महर्षी भाऊ कुंभार संकुलाचे उद्घाटन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र शेठ थोरवे, खोपोली नगराध्यक्षा सुमन औसरमल, उपनगराध्यक्षा विनिता कांबळे उपस्थित होते. केंद्र शासनाने सन २०१७/१८ च्या प्रस्तावांनाच मान्यता देऊ, असे राज्य शासनाला कळविले आहे.राज्यात मागील काही वर्षांत चांगले खेळाडू निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. केंद्राकडून खेलो इंडिया अंतर्गत महाराष्ट्र राज्याला चांगला निधी ..../२

अष्टविनायक हॉस्पिटलच्या बेकायदा जाहिरात फलकावर पनवेल महानगर पालिकेचा हातोडा

दै.रायगड नगरी । पनवेल

खांदा कॉलनीतील अष्टविनायक या बहुचर्चित हॉस्पिटलने आपली जाहिरात व्हावी या हेतूने चक्क हॉस्पिटल शेजारच्या सिडको उद्यानावर आपला जाहिरातीचा भलामोठा फलक लावला हा फलक लावून अनेक महिने उलटले तरी देखील या फलकाकडे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे लक्ष गेले नव्हते परंतु पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीने अ.. अतिक्रमणाचा अ.. आयुक्तांचा ही मोहीम सुरु केली या मोहिमेद्वारे महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे दाखवण्यास सुरुवात केली त्यात या अष्टविनायक हॉस्पिटलच्या अतिक्रमणाचा मुद्दा उचलण्यात आला. त्यानुसार आज पनवेल महानगर

पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या कारवाईचा हातोडा या बेकायदेशीर फलकावर पडला परंतु ही कारवाई होत असताना हॉस्पिटल प्रशासनाने तुमच्याकडे या कारवाई करण्याचे ऑर्डर आहेत का अशा उलट्या बोंबा मारण्यास सुरुवात केल्या.

अष्टविनायक हॉस्पिटल ने चक्क सिडको उद्यानाच्या कंपाउंड वॉलवरच हा भलामोठा फलक ठोकला. याबाबत सिडको किंवा महानगरपालिका यांच्याकडून कोणतीही परवानगी घेण्यात आली नाही. आत्ता चार दिवसापूर्वी हा मुद्दा चर्चेत आल्यानंतर ..../२

पनवेलच्या पु.ना.गाडगीळ ज्वेलर्समध्ये चोरी करणारा आरोपी अटक

दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार

पनवेल : पनवेलच्या पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स येथे सुपरवायझर म्हणुन काम करणारा आरोपी यांस पनवेल पोलीसांनी अखेर चोरी प्रकरणी अटक केले आहे.

याबाबत सविस्तर हकीकत अशी पनवेल येथे पु.ना.गाडगीळ यांच्या ज्वेलर्सची शाखा आहे येथे सुपरवायझर पदावर काम करणारा अभिषेक चंद्रशेखर मालनकर रा.ऐरोली ठाणे.याने सन २०१७ ते २०२० या कालावधीत मालकवर्गाची नजर चुकवुन थोडे थोडे करून ३१०.५००मी.ली सोन्याचे दागीने तसेच पीवर सोन्याचे कॉईन चोरी केले होते या बाबत व्यवस्थापनाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तशा प्रकारची तक्रार दाखल केली होती तसा पनवेल पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता.पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अजय लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हाचा तपास गुन्हे पथकाचे पोलीस निरीक्षक संजय जोशी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनी शिंदे पोलीस निरीक्षक सुनिल तारमाळे विजय आयरे वाघमारे परेश म्हाञे सुनिल गर्दनमारे यादवराव घुले राजु खेडेकर पवार साळुंखे यांनी कसोशीने तपास यंञणा राबवुन आरोपी मालनकर यांस खारघर येथुन ताब्यात घेऊन अटक केली सदर आरोपीस पोलीसी इंगा दाखवीताच तो पोपटासारखा बोलु लागला. आरोपीने सदर ९ लाख ३१ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल पनवेल भांडुप व झवेरी बाजार मुंबई अशा विविध ठिकाणी विक्री केल्याचे कबुल केले पोलीसांनी विविध ठिकाणी जाऊन खाञी करून १००% सोन्याचा माल हस्तगत केल्याने व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

मुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेट मुंबई टर्मिनस नमकरणासंबंधी केंद्रीय गृहमंत्री माननीय अमित शाह यांनी पाठपुरावा करण्यासाठीचे विनंतीपत्र मुंबई भाजप अध्यक्ष आ.मंगलप्रभात लोढा यांना समाजश्रेष्ठी दिनकर बायकेरीकर यांनी दिले. यावेळी डॉ.गजानन रत्नपारखी, श्रृती रत्नपारखी, सतीश पितळे, सुनिता बायकेरीकर उपस्थित होते. आ.लोढा यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाशी पाठपुरावा करुन केंद्रीय गृहमंत्री अमित शहांबरोबर भेट घडवून आणण्याचे आश्वासन दिले.

कळंबोलीतील कोव्हीड रुग्णालयाला स्व.दि.बा.पाटील यांचे देण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली येथे उभारण्यात येणाऱ्या कोव्हीड रुग्णालयाला स्व.दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे अशी मागणी प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी आज पाहणी दौऱ्यानिमित्ताने केली.

आज कळंबोली येथे दि बा पाटिल प्रकल्पग्रस्त समितीने केलेल्या मागणीनुसार सुरू होणार असलेल्या कोविड रुग्णालयाची प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील ह्यांनी पाहणी केली. ह्या हॉस्पिटलमधील सुविधा आणि करण्यात ..../२

छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याजवळील सुशोभीकरणाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. मावळे आणि हत्ती शिल्प लावण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून असे एकुण २२ शिल्प उभारण्यात आले आहेत.

पनवेल महानगर पालिका ही रायगड जिल्ह्यातील पहिली महापालिका आहे. रायगड जिल्ह्याचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेल शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे सुशोभिकरण करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील व ..../२

आस हक्काच्या पाण्याची

'पुणे तिथे काय उणे' असे म्हणण्याची पद्धत असली, तरी पिण्याच्या पाण्यापासून सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांपर्यंत अनेक बाबतीत पुणे उणे असल्याचे चित्र आहे. उत्तम पाऊसमान आणि अनेक धरणे असूनही पुण्याच्या बहुतेक भागांत नियमित पाणीपुरवठा होण्यात अडचणी आहेत. कधी काळी टुमदार असलेल्या पुण्यात पाण्याचा प्रश्न नसेलही; परंतु आज महानगर बनलेल्या पुण्यात हा प्रश्न तीव्र बनतो आहे. तरीही पाण्याच्या बाबतीत पुणे भाग्यवान असल्याचा गैरसमज राज्यात आहे आणि 'पुणेकर दिवसातून दोनदा अंघोळ करतात', 'ते रोज गाड्या धुतात' यांसारखी विधाने करून काही नेत्यांनी तो आणखी दृढ केला आहे. अगदी अलीकडेच झालेल्या हद्दवाढीमुळे क्षेत्रफळाच्या दृष्टीने मुंबईहूनही मोठे बनलेल्या पुण्याची तहान भागविण्यासाठी गांभीर्याने प्रयत्नांची गरज असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत अलीकडेच केलेले विधान महत्त्वाचे आहे. पुण्याच्या पूर्व भागाला पाणीपुरवठा करण्यासाठीच्या भामा आसखेड प्रकल्पाच्या लोकार्पण कार्यक्रमात पवार यांनी, मुळशी धरणाचे पाणी पुण्याला देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले आहे. पवार आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस एकाच व्यासपीठावर असल्याने राजकीयदृष्ट्याही महत्त्वाच्या बनलेल्या या कार्यक्रमात मुळशीच्या पाण्याचा उल्लेख झाल्याने पुण्याच्या पाणीप्रश्नावरील एक तोडगा समोर आला आहे. त्याचा साकल्याने विचार करण्याची, त्यामधील गुंतागुंत समजून घेण्याची आणि व्यावहारिक अडचणी जाणून घेण्याची आवश्यकता आहे. पुण्याची सध्याची लोकसंख्या आणि पुढील दशकभरात त्यामध्ये पडणारी भर, पुण्याच्या परिसरात होणारी वाढ, अन्य भागांतून होणारे स्थलांतर, पाणीपुरवठ्याच्या पायाभूत सुविधा, पाण्याच्या पुनर्वापराचे नियोजन आदी गोष्टी लक्षात घेऊन नियोजन व्हायला हवे. पवार यांच्या विधानाच्या निमित्ताने पुण्याचे पाण्याबाबतचे नेमके दुखणे जाणून घेणेही गरजेचे आहे. मुंबईतील तलावांमुळे तेथील महापालिका पाणीपुरवठ्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. पुणे महापालिकेला मात्र शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी राज्याच्या जलसंपदा विभागावर अवलंबून राहावे लागते; कारण पुण्याला पाणीपुरवठा करणारी धरणे जलसंपदा विभागाच्या अखत्यारित आहेत. सध्या पुणे महापालिका क्षेत्राला खडकवासला धरणसाखळीतून पाणीपुरवठा केला जातो. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांच्या साखळीची क्षमता ३० अब्ज घनफूट (टीएमसी) असून, त्यातील पाणी पुण्यासाठी, तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतीसाठी वापरले जाते. पुण्याला दर वर्षी १६.५ टीएमसी पाणी लागते; परंतु पुण्यासाठी ११.५ टीएमसी पाणी पुरेसे असल्याचे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे. ज्या लोकसंख्येच्या आधारे जलसंपदा विभागाने हे गणित मांडले आहे, ती लोकसंख्या दोन दशकांपूर्वीची आहे. पुण्याची सध्याची लोकसंख्या किती याचा नेमका आकडा नव्या जनगणनेनंतरच स्पष्ट होईल; परंतु शहराचा होत असलेला विस्तार, वाढती उपनगरे, स्थलांतरितांची वाढती संख्या पाहता पुणे पालिका क्षेत्रातील लोकसंख्या पन्नास लाखांच्या पुढे गेल्याचा अंदाज आहे. हा दाखला देऊन महापालिका १६.५ टीएमसी पाण्याची मागणी करते; परंतु ती जलसंपदा विभाग मान्य करीत नाही. त्यामुळे दर वर्षी वाद झडतात आणि पाणीकपातीचे शस्त्र उगारले जाते. पाण्यासाठी आता मुळशी धरण चर्चेत आणले असले, तरी ते मुळात वीजनिर्मितीसाठी उभारण्यात आले आहे. राज्यात सध्या वीज अतिरिक्त आहे हे खरे; परंतु मुळशीतून पुण्याला पाणीपुरवठा करण्यासाठी कोणतीही सुविधा नाही. ज्या भामा आसखेड प्रकल्पाचे लोकार्पण झाले, त्यातून पाणीपुरवठ्यासाठी पाचशे कोटी रुपये खर्च झाला असून, त्यासाठी आठ वर्षे लागली आहेत. मुळशीतून पाणी आणण्याच्या खर्चाचा आणि त्यासाठी लागणाऱ्या काळाचाही विचार म्हणूनच व्हायला हवा. भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी मुळशीचा पर्याय म्हणून विचार करायला हरकत नाही; परंतु तातडीची गरज आहे, ती पुण्याला 'खडकवासला'तून लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी देण्याची. पुणे महानगर विस्तारल्याने शेतीचे क्षेत्र आकुंचित पावत आहे. 'भामा आसखेड'मधून पुण्याला २.६ टीएमसी पाणी मिळणार असून, पिंपरी-चिंचवडसाठी त्याहून कमी पाणी लागणार आहे. उर्वरित पाणी शेतीलाच जाणार आहे. पाण्याच्या फेरवापराची सुविधाही पुणे पालिकेने उभारली असून, ६.५ टीएमसी पाणी परत सोडण्याची क्षमता आहे. मात्र, जलसंपदा विभाग ते पूर्णपणे घेत नाही. शेतीचे पाणी कमी करून पाणी द्या, असे पुणेकरांचे म्हणणे नाही; परंतु शेतीचे क्षेत्र कमी झाल्याने, पुनर्वापराचे पाणी उपलब्ध असल्याने आणि 'भामा आसखेड'चे पाणी असल्याने पुण्याच्या वाट्याचे पाणी वाढू शकते. त्यामुळे जलसंपदा विभागाने आपला हेका सोडून पुण्याला गरजेनुसार पाणी द्यायला हवे. वीजनिर्मिती थांबवून मुळशीचे पाणी पुण्याला आणण्यासाठी प्रयत्नशील असलेले पवार यांनी पुण्याचा पाण्याचा वाटा वाढविण्यासाठीही पावले उचलायला हवीत. अलीकडेच पुण्यानजीकच्या २३ गावांचा महापालिकेत समावेश करण्यात आला आहे. यांपैकी बहुतेक गावांत पाण्याची समस्या असून, टँकर नित्याचे बनले आहेत. पुण्यावरील पाणीपुरवठ्याचा ताण किती वाढणार याची यावरून कल्पना येते. म्हणूनच विस्तारलेल्या पुण्याची पाणीसमस्या आणखी बिकट होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.

राज्यातील लाखो मच्छिमारांमध्ये आर्थिक संकटामुळे उसळली संतापाची लाट

दै.रायगड नगरी । उरण

राज्यातील प्रत्येक मच्छिमारांना मासेमारी करण्यासाठी देण्यात येणारा डिझेल कोटा १५ दिवसांसाठीच सुमारे चार हजारांऐवजी फक्त १७५० लिटर्स देण्याचे फर्मान मत्स्यव्यवसाय आयुक्त कार्यालयाकडून काढण्यात आले आहे.याआधीच मच्छीमारांना डिझेल परताव्याची सुमारे २३० कोटी असलेली थकबाकी देण्यात शासनाकडून होणाऱ्या दिरंगाईमुळे राज्यातील लाखो मच्छीमार पुरता आर्थिक संकटात सापडला असतांनाच नव्याने मंजुर करण्यात आलेल्या कमी डिझेलमुळे मच्छिमारांना मासेमारी व्यवसाय करणे आणखी अवघड होऊन बसणार आहे.मत्स्यव्यवसाय विभागाच्या या मनमानी निर्णयामुळे मात्र राज्यातील लाखो मच्छिमारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राज्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि पालघर, ठाणे,रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांतुन प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर मासेमारी व्यवसाय केला जातो.या मच्छिमार व्यवसायावर सुमारे पंधरा लाख कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो.या सात जिल्ह्या-तील १६० मच्छिमार संस्थांच्या ९६४६ मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकासाठी १ ते १५ जानेवारी २०२१ या दरम्यान १५ दिवसांसाठी खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या प्रत्येक यांत्रिक बोटीसाठी १७५० लिटर्स डिझेल देण्याचे फर्मान मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांनी काढले आहेत.याआधी खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या यांत्रिक नौकेसाठी मच्छिमारांना सहा महिन्यांपर्यत पुरेल इतका डिझेल कोटा मंजूर करण्यात येत होता.

त्यामुळे देण्यात येणारा १७५० लिटर्स डिझेल कोटा एका ट्रिपसाठी अत्यंत अपुराच आहे. मासळीसाठी खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना कधी कधी २० -२५ दिवसांची ट्रीप करावी लागते.त्यामुळे मच्छीमारांवर आता बाहेरून ज्यादा दराने डिझेल खरेदी करण्याची पाळी येऊन ठेपली आहे.यामुळे मच्छीमा मच्छिमारां च्या खर्चात आणखी अतिरिक्त वाढ होण्याची भिती मच्छीमा मच्छिमारांकडून व्यक्त केली जात आहे.देशाला मासळी निर्यातीतुन मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारा मासेमारी व्यवसाय सध्या अनेक कारणांमुळे आर्थिक संकटात सापडला आहे. समुद्रात मासळीचा जाणविणारा मासळीचा दुष्काळ, मासळीच्या दलालांकडून होणारी लुबाडणूक, मासळीच्या भावात सातत्याने होणारी घसरण आदी बाबींमुळे तर मच्छीमार याआधीच बेजार झाले आहेत.त्यामध्ये मागील दोन वर्षांत लागोपाठ आलेल्या विविध वादळांमुळे मच्छिमारांनाअनेक महिने व्यवसाय बंद ठेवण्याची पाळी आली होती.त्यातच राज्यातील लाखो मच्छीमारांची डिझेल परताव्याची २२८ कोटी १६ लाख रुपये थकित असलेल्या रक्कमेअभावी मच्छीमार आर्थिक कोंडीत सापडला आहे. थकित असलेल्या डिझेल परताव्यांसाठी मच्छिमारांचा शासनाशी संघर्ष सुरू आहे.त्यामध्ये आता १ ते १५ जानेवारी २०२१ या दरम्यान १५ दिवसांसाठी फक्त १७५० लिटर्स इतकाच डिझेल कोटा मंजूर करण्याच्या मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांनी घेतलेल्या निर्णयाची भर पडली आहे. आयुक्तांच्या या आततायी निर्णयामुळे मात्र राज्यातील मच्छिमारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मच्छीमारांना किमान सहा महिन्यांसाठी पुरेल इतका डिझेल कोटा मंजूर करण्यात यावा अशी मागणी मच्छिमारांकडून करण्यात येत आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील लाखो मच्छीमार शासनाकडे थकित असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या डिझेल परताव्याच्या रक्कमेची प्रतिक्षा करीत असतानाच १५ दिवसांसाठी फक्त १७५० लिटर्स इतकाच डिझेल कोटा मंजूर करून मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांनी मच्छीमारांच्या जखमेवर मीठ चोळले आहे.

बालिका दिनी स्त्रीमुक्ती व बेटी बचाव, बेटी पढाओचा नारा

दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प सुधागड-पाली अंतर्गत पाली बिटातील अंगणवाडी सेविकांनी रविवारी (ता.३) बालिका दिन साजरा केला. यावेळी स्त्रीमुक्ती व बेटी बचाव, बेटी पढाओ चा नारा देत रॅली काढण्यात आली, मान्यवरांनी प्रबोधन केले, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिमुकल्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गौरव गीत व नृत्य सादर केले. तसेच अंगणवाडी सेविकांनी विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाअंतर्गत स्त्रीजन्माचे स्वागत, बेटी बचाव बेटी पढाओ शपथविधी आणि बचत गटाच्या महिलांचा सत्कार अंगणवाडी सेविकांचा कोरना योद्धा म्हणून गौरव करण्यात आला. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन पर्यवेक्षिका लखीमळे मॅडम, अंगणवाडी सेविका मनस्वी भालेराव, साक्षी फोंडे, कविता दंत, स्नेहा गायकवाड, अश्विनी गायकवाड, संध्या खंडागळे, वर्षा शिंदे, नेहा काटकर, प्रतीक्षा ठोंबरे, केतकी साजेकर, शर्मिला पाशिलकर यांनी केले होते. कार्यक्रमास प्रकल्प अधिकारी म्हात्रे मॅडम, पर्यावेक्षिका लखीमळे मॅडम, युवा कार्यकर्ते अमित निंबाळकर, संदीप दपके, किरण चव्हाण, निलेश पवार, सागर मिसाळ, प्रदीप गोळे, नम्रता मिसाळ व विविध बचत गटांच्या महिला आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

जाहीर नोटीस

मी श्री.किशोर हरिश्चंद्र घरत पत्ता : ६५, मुलजी हाऊस, तिसरा मजला, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी मुंबई ४०००२५ असे जाहीर करतो की, माझे वडील कै.हरिश्चंद्र केशव घरत दि सेन्चुरी टेक्सटाईल ॲण्ड इंडस्ट्रीज लिमिटेड (सेच्युरी मील) मुंबई येथे काम करीत होते. दरम्यान दिनांक ०३/०८/२०१० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मी मुलगा श्री.किशोर हरिश्चंद्र घरत, त्यांचा वैध वारस आहे. त्यासाठी मी जिल्हाधिकारी जुने जकात घर मुंबई येथे वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे. अन्य कुणास हरकत असेल त्यांनी जिल्हाधिकारी जुने जकात घर, मुंबई येथे सात दिवसात संपर्क करावा.

सही/-
श्री.किशोर हरिश्चंद्र घरत
मो.नं.९८२०६७४०६७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.जयराम नथु शेळके यांचयाकडून कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
मौजे : पाली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड

स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे	मालकांचे नाव
२७	२	०.२९.०० पो.ख.०.११.३०	१.३४	श्री.जयराम नथु शेळके

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०४/०१/२०२१

सही/-
ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९८९२२२२२५७

मा.पाठक सो

अर्जदार तर्फे वकील एन.बी.कटेकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७९०/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१०/२/२०२१

१) श्रीमती.रुक्मिणी नामदेव ठाकूर (पत्नी)
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.न्हावाखाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.विरेंद्र नामदेव ठाकूर (मुलगा)
वय : ५४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.ब्लॉक नं.४, बिल्डींग नं.४ बी,
आशापुरी नगर को.ऑप.हौ.सो., पंचरत्न हॉटेल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.ज्ञानेश्वर नामदेव ठाकूर (मुलगा)
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सदनिका क्र.२०१, बी विंग,
द्वारका नगर, म्हातवली, नागाव,
ता.उरण, जि.रायगड ४००७०२

अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअथी कै.नामदेव जोमा ठाकूर हे दिनांक २८/०७/२०१९ रोजी मौजे : न्हावाखाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.नामदेव जोमा ठाकूर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.नामदेव जोमा ठाकूर यांच्या सामाईक मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील

मौजे/गाव	जुना सर्व्हे नं./ हिस्सा नं.	नवीन सर्व्हे नं. हिस्सा नंबर	क्षेत्र	आकार रु.पै.
न्हावे २/९४	अ/५०४	७ अ/५०४	०-२९-०	१.६२
	अ/७५३	९ अ/७५३	०-०४-३	०.२५
	अ/१०१५	१२ अ/१०१५	०-१२-०	०.२२
	अ/१०३५	१२ अ/१०३५	१-१९-९	१४.१९
	१३६ ते १४१ ५८/२९	१४/२९	०-३०-३	२.८१
न्हावे १/९४	अ/९०९	११ अ ९०९	०-३३-०	२.०६
	अ/७३८	९ अ/७३८	०-०८-०	०.३३

वरील अर्जदार हे मयत कै.नामदेव जोमा ठाकूर यांचे कायदेशीर वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.नामदेव जोमा ठाकूर यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.४/१/२१ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
व.लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब

अर्जदारतर्फे वकील श्री.निवृत्ती पावशे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७२०/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.०८/२/२०२१

१) श्रीमती.गीता पद्माकर मोकल (पत्नी)
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सचिन पद्माकर मोकल (मुलगा)
वय : ४० वर्षे, धंदा : व्यवसाय
३) कै.सत्यवान पद्माकर मोकल (मुलगा मयत)
चे कायदेशीर वारस
३/१) श्रीम.रेश्मा सत्यवान मोकल (सुन)
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.न्हावेखाडी मधलापाडा,
गणेश मंदिराजवळ, पो.न्हावे
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.सुवर्णा संदीप म्हात्रे (मुलगी)
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.१४४, ठाकूर मास्टर गल्ली, जासई,
पो.जासई, ता.उरण, जि.रायगड

अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.पद्माकर गणपत मोकल हे दिनांक १३/०५/२०२० रोजी मौजे : न्हावेखाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.पद्माकर गणपत मोकल यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.पद्माकर गणपत मोकल यांच्या सामाईक मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील

अ. क्र.	गाव	युनिट केस नं.	जुना सर्व्हे /गट क्र.	नवीन सर्व्हे / गट क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	न्हावे	२/१९९४	६ ते १४१ ५८/५	१४/५	०-२७-००	१.५०
२	न्हावे	२/१९९४	अ/४७५	६/अ/४७५	०-२३-००	२.३७
३	न्हावे	२/१९९४	अ/९४१	११/अ/९४१	०-२७-००	१.८७
४	न्हावे	२/१९९४	अ/९१३	११/अ/९१३	०-३४-००	१.८७
५	न्हावे	२/१९९४	अ/८४९	१०/अ/८४९	०-३२-००	१.५६
६	न्हावे	२/१९९४	अ/८६४	१०/अ/८६४	०-१३-००	०.५५

वरील अर्जदार हे मयत कै.पद्माकर गणपत मोकल यांचे कायदेशीर वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल आणि ते जर कै.पद्माकर गणपत मोकल यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.४/१/२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
व.लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

भरीव निधी उपलब्ध करून द्यावा : ना.आदिती तटकरे

मिळावा, महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त प्रस्तावांना मंजुरी मिळावी, यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे व रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी केंद्र शासनाकडे भक्कम बाजू मांडून पाठपुरावा करावा, असे विनंतीवजा आवाहन कु.तटकरे यांनी यावेळी केले.

त्या पुढे म्हणाल्या की, राज्यात इतर महसुली विभागांचे क्रीडा संकुल निर्माण होत आहेत. मात्र कोकण विभागाचे क्रीडा संकुल नसल्याने याचा पाठपुरावा केल्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने रायगडातील माणगाव येथे कोकण विभागीय क्रीडा संकुल उदयास येत असून तीस एकर जागा हस्तांतरितही करण्यात आली आहे. तसेच तालुकास्तरीय क्रीडा संकुलासाठी या पूर्वीचे शासन एक कोटी रुपये देत होते, त्या निधीमध्ये भरीव तरतूद करीत या वर्षापासून पाच कोटी रुपयांचा निधी तालुका क्रीडा संकुलासाठी देण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी केली.

क्रीडा व युवक कल्याण विभाग स्वतंत्र करण्याच्या मागणीलाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्यता दिल्याचे कु.आदिती तटकरे यांनी असे सांगून हे शासन ज्या पद्धतीने निर्णय प्रक्रिया अवलंबित आहे, त्यानुसार राज्य प्रगतीपथावर निश्चित जाईल, असा विश्वास व्यक्त केला. खोपोली नगरपालिकेने विकासासाठी ठराव करून द्यावा,विकास कामांसाठी निधी कमी पडून देणार नाही, अशीही घोषणा पालकमंत्री कु. तटकरे यांनी यावेळी केली.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी कुस्ती महर्षी खाशाबा जाधव व खोपोलीचे भाग्यविधाते भाऊ कुंभार यांच्या कार्याचा गौरव करीत भाऊ कुंभार यांच्याबरोबर माझे व्यक्तीगत मित्रत्वाचे संबंध होते आणि आमची अनेकदा भेटही झाली असल्याचे सांगितले.

स्थानिक आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी भाऊसाहेब कुंभार यांनी आयुष्याचे योगदान रायगडातील कुस्तीसाठी दिले असे सांगत त्यांच्या कार्यातून आज महाराष्ट्र पातळीवर मोठमोठे कुस्तीपटू तयार झाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, गटनेते सुनील पाटील व नगरसेवक,पदाधिकारी, स्थानिक खेळाडू, शासकीय अधिकारी-कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महानगर पालिकेचा हातोडा

हॉस्पिटल प्रशासनाकडून महानगरपालिकेकडे परवानगीसाठी हालचाल करण्यात आली. मात्र महानगरपालिका किंवा सिडकोने या हॉस्पिटलला परवानगी दिली नाही. याउलट पत्रकारांच्या मागणीची दखल घेत या फलकावर कारवाईस सुरू केले. परंतु हॉस्पिटल प्रशासनाने या कारवाईत अडथळे आणण्यास सुरुवात केली. आता प्रश्न असा उपस्थित होत आहे की, बेकायदा जाहिरातबाजी करणे बेकायदेशीरपणे फलक लावणे तसेच महानगर पालिका कर्मचाऱ्यांच्या कारवाईला विरोध करणे म्हणजेच शासकीय कामात अडथळा आणणे हे गुन्हे महानगरपालिकेकडून या हॉस्पिटल प्रशासनावर लावण्यात येतील का? अशी चर्चा आहे.

स्व.दि.बा.पाटील यांचे देण्याची मागणी

येणार असलेल्या उपाययोजनांचा सिडकोच्या अधिकाऱ्यांसह आढावा घेतला. लवकरच सिडकोचे मॅनेजिंग डायरेक्टर मुखर्जी ह्यांची भेट घेऊन इस्पितळ व रुग्णांच्या इतर सोयसुविधांबाबत प्रकल्पग्रस्त समिती चर्चा करणार आहे. तसेच प्रकल्पग्रस्त समिती सोबत चर्चा करून सदर इस्पितळाला स्वर्गीय दि. बा. पाटील ह्यांचे नाव देण्यात यावे अशी मागणीही मुख्यमंत्री, सन्माननीय नगरविकासमंत्री, सिडको तसेच महापालिकेकडे करणार असल्याचे प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील ह्यांनी सांगितले.

सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात

सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी करून या संदर्भात सातत्त्याने पाठपुरावा केला. त्यानुसार महानगरपालिकेच्या माध्यमातून शिवाजी चौक येथील सर्वांचे आकर्षणाचे केंद्र बिंदू असलेले छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे सुशोभीकरण पूर्ण होत असल्याने शिवप्रेमींनी विशेष आनंद व्यक्त केला आहे. रयतेला लेकराप्रमाणे मानणारा हा राजा केवळ महान युगपुरुष नव्हता तर मानवतेचे उत्कृष्ट तत्वज्ञान सांगणाऱ्या व आचरणाच्या महात्म्याप्रमाणे ते वंदनीय थोर युगपुरुष. अशा या युगपुरुषाचा इतिहास तरुणांबरोबरच शिवप्रेमींना प्रेरणादायी ठरण्यासाठी सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील आणि सत्ताधारीं पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी या विषयी सभागृहात प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. आता महाराजांच्या पुतळ्याजवळील सुशोभीकरणाला वेग आला असून येत्या काही दिवसात सुशोभीकरणाचे काम पूर्ण होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मोत्सव सोहळा व महिला शिक्षणदिन साजरा

दै.रायगड नगरी । तळा

पंचायत समिती व एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प तळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जन्मोत्सव सोहळा महिला शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर जि.प.सदस्या गिताताई जाधव, पं.स.अध्यक्षा अक्षरा कदम, माजी पं.स.अध्यक्षा देवकी लासे, रा.काँ ता.अध्यक्षा जान्हवी शिंदे, लताताई मुंढे, ग्रामविकास अधिकारी नेरकर मँडम सचिन कदम अँड उत्तम जाधव.उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री अदिती ताई म्हणाल्या कि सावित्रीबाई मुळे आज महिलांचा सर्व ठिकाणी मान सन्मान होत आहे आज पुरूषांपेक्षा काकणभर सरस आहेत. महीला आरक्षणामुळे सर्व प्रकारच्या राजकीय शैक्षणिक, शासकीय सेवेत संधी प्राप्त झाली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून या वर्षापासून सावित्रीबाईचा जन्मोत्सव हा महिला शिक्षण दिन साजरा होतो आहे. हे आपले भाग्य आहे म्हणून अंगणवाडी सेविका, मदतनीस याचे काही कारणाने अर्धवट राहिलेले शिक्षण पुर्ण केले त्यांचा सन्मान करताना मनापासून आनंद होत आहे तसेच पुरुष स्त्री समानता समजून ज्या दांपत्याने आपले फॅमिली प्लॅनीग केले हे कौतुक आहे. शासनाच्या भाग्यश्री योजनेचा लाभ देऊन त्या अपत्यांच्या नावे निधी उपलब्ध करुन देण्यात येतो आहे. २/१ मुली अपत्य असणाऱ्या चा दाम्पंत्याचा सन्मान पालकमंत्री यांच्या हस्तेशाल श्रीफळ,गुलाब पुष्प देऊन करण्यात आला.यावेळी सावित्रीबाईच्या जीवनातील इतिहासातील एकांकिका, ओव्या, चरित्र जीवन पटाची पाने उलटून स्मृती जाग्या केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालविकास प्रकल्प अधिकारी वंदना शिंदे यांनी केले तर सुत्र संचालन उल्का माडेकर यांनी केले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पाली ग्रामपंचायतीतील सफाई कामगारांना नगरपंचायतीत सामावून घेण्यास प्रथम प्राधान्य देणार : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

पाली नगरपंचायत स्थापित झाल्याने विकासाला दिशा व चालना मिळाली असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केले. पाली ग्रामपंचायत कार्यकाळातील सफाई कामगारांना नगरपंचायतीत सामावून घेण्यास प्रथम प्राधान्य देणार असल्याची ग्वाही पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दिली. पाली नगरपंचायत होणेकामी केलेले सहकार्य व योगदानाबद्दल पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांचा राष्ट्रवादी शेकाप आघाडीच्या वतीने पालीत नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

पालकमंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या मनोगतात म्हटले की पाली गावाला नगरपंचायतीचा दर्जा प्राप्त झाल्याने विकासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. जनतेला अधिकाधिक सेवासुविधा प्राप्त होणार आहेत. पाली ग्रामपंचायतीच्या कार्यकाळात मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना नगरपंचायतीत समावेश करून घेण्याबाबतची भूमिका सर्वप्रथम घेतली जाईल. तसेच जि . प च्या अंतर्गत असलेल्या ग्राम पंचायतीच्या ताब्यातील मालमत्ता नगरपंचायतीकडे वर्ग करण्या संदर्भात अधिक कालावधी लागतो, परिणामी या मालमत्तेच्या दुरुस्तीसाठी अडचणी उदभवतात, ही मागील पाश्वभूमी पाहता पुढील काळात अशी परिस्तिती उदभवू नये यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे पालकमंत्री तटकरे यांनी सांगितले. सुधागड तालुक्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्वपूर्ण असलेला

ग्रामीण रुग्णालय उभारणी संदर्भात प्रशासन स्तरावर जलद प्रक्रिया होणेकामी आवश्यक तो पाठपुरावा सुरू आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील अष्टविनायक देवस्थान क्षेत्राचे विकासाचे आराखडे तयार करण्यासंदर्भात तसेच पुढील कार्यवाहीच्या सूचना पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. पाली शहराला वर्षांनुवर्षे भेडसावणारी वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना व नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे ना. आदिती तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी वसंतराव ओसवाल यांनी सांगितले की पालकमंत्री आदिती तटकरे यांनी पालीला नगरपंचायतीचा दर्जा मिळावा यासाठी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा व प्रयत्नांना यश आले आहे. शिवाय पालीच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाच्या दृष्टीने घेण्यात आलेले विविध सकारात्मक निर्णय व भूमिका कौतुकास्पद असल्याचे समाधान माजी जिल्हाध्यक्ष वसंतराव ओसवाल यांनी व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते वसंतराव ओस-वाल , शेकापचे ज्येष्ठ नेते तथा जि प सदस्य सुरेशशेठ खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड जिल्हाध्यक्षा गीताताई पालरेचा,सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष रमेश साळुंके, पाली शहर अध्यक्ष अभिजित चांदोरकर, सुधागड तालुका राष्ट्रवादी महिला अध्यक्ष सौ. भणगे, माजी सभापती साक्षीताई दिघे, सुधागड तालुका युवक अध्यक्ष संदेश शेवाळे, सुधागड तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष सुलतान बेनसेकर, अल्पसंख्याक पाली शहर अध्यक्ष मोहम्मद भाई धनसे, साधुराम साजेकर, सागर मिसाळ, भाऊ मोहिते, दिनेश बुरुमकर, दीपक पवार, पप्पू परबळकर, सुशील शिंदे, सुजाता वडके, नम्रता मिसाळ, इसाक पानसरे, हुसेन लद्दु, जनार्दन जोशी, उत्तमराव देशमुख, आरिफ मणियार, सुधीर साखरले, नरेश खाडे, संजोग शेठ, गजानन शिंदे, आदींसह शेकाप राष्ट्रवादी आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंजिनियर ज्युसवाला बनला विचुंबेमधील चर्चेचा विषय

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेलजवळील नव्याने विकसित असलेल्या विचुंबे या विभागात इंजिनियरिंग शिक्षण घेतलेल्या दोघा मराठी बंधुंनी इंजिनियर ज्युसवाला हा नवीन व्यवसाय नुकताच सुरू केला असून या व्यवसायाबरोबर ग्राहकांनी त्यांच्या तब्येतीस आवश्यक असणारा कोणता ज्युस घ्यावा याचे मार्गदर्शनसुद्धाते करीत असल्याने विचुंबे परिसरात मोहिते बंधू हे अल्पावधित चचर्चेचा विषय बनले आहेत.

मुंबईतील सायन कोळीवाडा या ठिकाणी मुळ वास्तव्यास असलेले ललित ज्ञानेश्वर मोहिते आणि रोहित ज्ञानेश्वर मोहिते काही वर्षांपूर्वी विचुंबे येथे राहण्यास आले. दरम्यानच्या काळात इंजिनियरींगचे शिक्षण घेवून दोन वर्षे नोकरी न मिळाल्यामुळे व लॉकडाऊनच्या काळात या दोन भावंडांनी स्वतःचा ज्युसचा व्यवसाय सुरू केला आहे. विचुंबे गावात सुरू केलेल्या ज्युस सेंटरला त्यांनी इंजिनियर ज्युसवाला असे नाव दिल्यामुळे हा विषय चर्चेचा ठरला आहे.मुळ गाव सातारा असलेले ललित आणि रोहित मोहिते हे दोन भाऊ काही चार वर्षांपासून पनवेलमधील विचुंबे येथे राहतात. लहान भाऊ रोहित मोहिते सिव्हील इंजिनियरींगमध्ये पदवीधर आहे तर ललित याने इंजिनियरींगला अँडमिशन घेतल्यानंतर रेल्वेत प्रशिक्षणार्थी म्हणून तीन वर्षे काम केले. मात्र काही कारणास्तव हे शिक्षण पुर्ण होवू न शकल्यामुळे दोन वर्षांनी इंजिनियरींगचे शिक्षण पुर्ण झाले नाही. दोन्ही मुलांनी इंजिनियर व्हावे आईचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी ललित सध्या मुंबईतील सोमय्या कॉलेजात मँकेनिकल इंजिनियरींग डिप्लोमाच्या शेवटच्या वर्षांत शिकतो आहे. सरकारी कॉलेजात फी कमी लागते, खासगी कॉलेजात शिक्षणाचा खर्च परवडणारा नसल्यामुळे त्याने दहावीला मिळालेल्या ९१ टक्के गुणांच्या जोरावर सोमैया कॉलेजात २०१८ साली कॉलेजात प्रवेश घेतला. ललितचा लहान भाऊ मात्र पुण्यातील मोझे इंजिनियरिंग कॉलेजात ७३ टक्के गुण मिळवून इंजिनियर झाला. तरी देखील दोन वर्षांपासून नोकरी मिळू शकली नाही. वडील माथाडी कामगार असल्यामुळे घरची परिस्थिती फार चांगली नसल्यामुळे काय करावे असा प्रश्न उपस्थित झाला. सहा महिन्यांनी ललित मँकेनिकल डिप्लोमा इंजिनियरींगचे शिक्षण पुर्ण करेल. मात्र तरी देखील घरी आर्थिक मदत करण्यासाठी इंजिनियर असलेल्या या बंधुंनी विचुंब्यात ज्युसचा व्यवसाय सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी काही दिवस नवीन पनवेल येथील एका ज्युस सेंटरमध्ये ते विना मोबदला कामाला होते. तेथून त्यांनी सिझनलफळे कशी वापरावीत, साखरेचे प्रमाण, सिरपचे प्रमाण, बाजारपेठ आदींची माहिती घेतली. ललित मोहिते हा फिटनेस ट्रेनरव योगा इन्स्पेक्टरसुद्धा असल्याने तो त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांना प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक व गरोदर महिला वर्गाला या काळात कोणता ज्युस आवश्यक आहे याची माहिती देत असतो. अत्यंत वाजवी दर असल्याने ग्राहकांची गर्दी येथे चांगलीच असते. इतर ज्युसप्रमाणेचमलई फालुदा ही त्याची स्पेशालिटी असल्याने ग्राहक याची चवआवर्जून घेतात.

मा.बहिर साहेब

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.७६१/२०२०

नि.नं.७/ड

ने.ता.१०/२/२०२१

कै.शांताराम काळुराम पाटील
१) श्री.नवनीत शांताराम पाटील
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी.१०२, नील्स लेक व्ह्यू,
प्लॉट नं.२०, सेक्टर ६, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.रेणुका सिताराम घरत
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.प्रगती श्रावण म्हात्रे
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.मानसी महेश पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जांभूळपाडा, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.शांताराम काळुराम पाटील ह्यांचे निधन दि.२६/०८/२०१४ रोजी मु.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच कै.शांताराम काळुराम पाटील यांची पत्नी कै. नामुबाई शांताराम पाटील ह्यांचे निधन दि.१५/०९/२०१० रोजी झालेले आहे. तसेच कै.शांताराम काळुराम पाटील यांची आई कै.बामुबाई काळुराम पाटील ह्यांचे निधन दि.०५/१०/१९७८ रोजी मु.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाल्याने श्री.नवनीत शांताराम पाटील वगैरे ह्यांनी कै.शांताराम काळुराम पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

गावाचे नांव	यु.के.नं.	स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
वहाळ	४३३ अ	१३०	५	०-०३-८	०.४२
		१२८	२	०-०४-३	०.४८
		८९	४	०-०३-३	०.६०
		९३	२	०-०१-५	०.२८
		३०	१	०-०३-०	०.३३
	३५३ अ	८५	४	०-०२-४	०.४१
		७३	४	०-०४-६	०.३३
	६२४ अ	६६	४	०-५-०	
		७९	१२	०-२-६	
		९०	७	०-२-९	
				०-१-०	
		९१	९	०-४-०	
		५६	५	०-३-५	
	५५१ अ	१३०	८	०-०८-९	
		११३	२	०-०३-०	
		११०	१२	०-०९-१	
		९४	८	०-०९-१	
		९४	३	०-०५-०	
		८६	२	०-०२-५	
		४३	१०	०-०२-३	
		३१	३	०-११-०	
		३०	१०	०-०४-०	
		३०	५	०-०७-०	
		८०	१०	०-०२-५	
		८५	६	०-०४-०	
				०-०१-०	
	८५१	७९	१७	०-०२-०	०.३९
		१३०	३	०-०३-८	०.४२
		८०	४	०-०२-०	०.३९
	४४४	१३०	६	०-७-९	०.८७

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.शांताराम काळुराम पाटील यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे अंदाजे क्षेत्र ९०० चौ.मी. हा भूखंड वितरित करण्यात आलेला आहे. श्री.नवनीत शांताराम पाटील वगैरे हे कै. शांताराम काळुराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.नवनीत शांताराम पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.शांताराम काळुराम पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/१/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब
वारसाचं सर्टिफिकेटबद्दल जाहीरनामा

अर्जदाराचे वकील
ॲड.पल्लवी गुळीग

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६०७/२०२०

नि.नं.८/ड

ने.ता.१७/२/२०२१

१) श्रीमती.गुलाब रमेश राऊत
२) श्री.अमोल रमेश राऊत
३) सौ.दिक्षा दिपक मयेकर उर्फ दिक्षा रमेश राऊत
रा.घर नं.१२८६, गावदेवी पाडा,
राम गणेश मंदिर, जुने पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
४) सौ.माधुरी महेश साकरु उर्फ माधुरी रमेश राऊत
रा.रुम नं.१०४, पंचपरमेश्वर अपार्टमेंट,
सावरु चाळ, शबरी कंपाऊंडच्या जवळ,
ठाणे (वे) ४००६०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे नवरा, वडील कै.रमेश काशिनाथ राऊत दिनांक ०४/०७/२०२० रोजी पनवेल येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत.

कै.रमेश काशिनाथ राऊत यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	गावाचे नाव	मिळकतीचा तपशिल
१	जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड	घर नं.१२८६, गावदेवीपाडा, राम गणेश गडकरी रोड, गावदेवी मंदिराच्या मागे, जुने पनवेल, क्षेत्रफळ ८६ चौ.मी.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.रमेश काशिनाथ राऊत यांचे कायदेशीर वारस आहेत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.रमेश काशिनाथ राऊत यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/१/२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.पाठक
वारसाचं सर्टिफिकेटबद्दल जाहीरनामा

ॲड.सरिता सुभाष मोरे व
ॲड.प्रशांत पाटील
अर्जदार यांचे वकील

जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात, पनवेल

दि.चौ.अर्ज क्र.८०४/२०२०

नि.नं.७/ड

ने.ता.१६/२/२०२१

१) श्री.राहूल लक्ष्मण कणसे
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.कुणाल लक्ष्मण कणसे
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्रीमती.मनाली राणाबा पाटील
(मनाली लक्ष्मण कणसे, लग्नाआधीचे नाव)
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी
फ्लॅट नं.२०६, दुसरा मजला, माही पार्क,
प्लॉट नं.बी-३०, सेक्टर नं.१६,
उलवे नोड, नवी मुंबई ४१००६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, विजया लक्ष्मण कणसे यांचा मृत्यू दिनांक २०/०५/२०१९ रोजी, सुराना शेठीया हॉस्पिटल प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा, ग्रेटर मुंबई येथे आजाराने मयत झाल्या. अर्जदार राहूल लक्ष्मण कणसे, श्री.कुणाल लक्ष्मण कणसे व श्रीमती.मनाली राणाबा पाटील हे राहणार माही पार्क, फ्लॅट नं.२०६, प्लॉट नं.बी-३०, सेक्टर नं.१६, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी या मा.न्यायालयात सदरहू मयतांचे खालील वर्णनाची मिळकतीचे

मिळकतीचे वर्णन

माही पार्क, फ्लॅट नं.२०६, प्लॉट नं.बी-३०, सेक्टर नं.१६, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६, क्षेत्र २८.२१५ (कारपेट) चौ.मी.असा मोजमापाचा फ्लॅट

वरील फ्लॅट हे अर्जदारांचे नाव तबदील होणेसाठी अर्जदार याने मुंबई रेग्युलेशन VIII ॲक्ट १८२७ अंतर्गत लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी ना.कोर्टात प्रस्तुतचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार नं.१ ते ३ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस/संस्थेस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ठिक ३० दिवसांचे आतमध्ये ना.कोर्टात व्यक्तीशः अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती दाखल कराव्यात. येणेप्रमाणे मुदतीत हरकती आल्यास, ना.कोर्ट अर्जदार याने वर नमूद केलेल्या फ्लॅटच्या तबदीलीबाबत पुरावा घेण्याची कारवाई पूर्ण करून, योग्य ते लिगल हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार याचे लाभांत पारित करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. माहे जानेवारी २०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब

ॲड.भूषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.७३७/२०२०

नि.नं.८/ड

ने.ता.०६/२/२०२१

कै.विनोद दत्तात्रेय मोरे मयतचे वारस
१) श्रीमती.विनिता विनोद मोरे
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विनित विनोद मोरे
वय : २३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.कुलाबा पोलीस वसाहत,
तळमजला, रुम नं.२३,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४०००१ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांचे दिनांक ०६/०९/२०१७ रोजी रा.रुम नं.२३, कुलाबा पोलीस वसाहत, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई येथे निधन झाले असून कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांची आई कै.इंदिराबाई दत्तात्रेय मोरे यांचे दिनांक ३०/०१/२०१७ रोजी रा.मु.पो.कळंबस्ते, ता.चिपळुण, जि.रत्नागिरी येथे निधन झाले असून श्रीमती.विनिता विनोद मोरे, वगैरे ह्यांनी कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

राज कौ.हौ.सो.लि., रुम नं.बी.२०५, दुसरा मजला, क्षेत्र ३४५ चौ.फूट सुपर बिल्टअप, (३२.०७ चौ.मी. सुपर बिल्टअप क्षेत्र) आणि २७६ चौ.फुट बिल्टअप क्षेत्र (२५.६५ चौ.मी.बिल्टअप क्षेत्र)

प्लॉट नं.३८, सेक्टर १२, कामोठे नवी मुंबई,

सदर सदनिकेची एकूण किंमत रु.२,८४,२८०/-

(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख चौऱ्याऐंशी हजार दोनशे ऐंशी मात्र)

वरील मिळकत ही, कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.विनिता विनोद मोरे वगैरे हे, कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.विनिता विनोद मोरे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर, कै.विनोद दत्तात्रेय मोरे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/१/२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

खदानीत पडल्याने महिलेचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

कपडे धुण्यासाठी खदानीत गेलेल्या महिलेचा पाय घसरुन पाण्यात पडल्याने त्यात बुडून तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील खैरणे गावात घडली आहे.

खैरणे गावात असलेल्या पाण्याच्या खदानीत कपडे धुण्यासाठी सुरवंता खंडू माने (२८) या गेल्या असता त्यांचा पाय घसरल्याने त्या खदानीत पाण्यात पडल्या. त्यात त्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कु.त्रिशा किरण म्हात्रे विज्ञान प्रदर्शनात उरण तालुक्यात प्रथम

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल (DIECPD पनवेल) च्या वतीने दि.२४-२-२०२० ते २८.२.२०२० दरम्यान रायगड जिल्ह्यातील शाळांमध्ये विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरनेर येथे विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यानी या सप्ताहात छोटया नाटिका,पोस्टर मेकिंग स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन आणि शेवटी सर्व साहित्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.या विज्ञान प्रदर्शनात कु.त्रिशा किरण म्हात्रे हीने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी केंद्रप्रमुख टी.जी.म्हात्रे, सौ ज्योती ठाकूर, साधनव्यक्ती DIECPD यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शन केले होते. विज्ञान सप्ताहातील विज्ञान प्रदर्शनात इयत्ता चौथीत शिकणारी कु.त्रिशा किरण म्हात्रे हिने उरण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे दिनांक ३१.१२.२०२० रोजी झूम मिटींगद्वारे ऑनलाईन पद्धतीने कोरोनाच्या नियमांचे पालन करत आयोजन करण्यात आले.कु त्रिशा म्हात्रे हिने प्रथम क्रमांक पटकाविल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.तिच्या यशामुळे तिला मार्गदर्शन करणारे वर्गशिक्षक सुरेश पाटील सर, विज्ञान सप्ताह यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणारे शाळेतील शिक्षक विश्वनाथ गावंड,सौ रंजना कोळी, सौ संगिता गावंड, रोहिदास शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक प्रविण म्हात्रे आणि त्रिशाचे पालक किरण म्हात्रे व चैताली म्हात्रे या सर्वांवर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

कर्तृत्वानांचा सत्कार करणे ही आपली संस्कृती : आ.प्रविण दरेकर

पनवेल मिडिया प्रेस क्लबकडून पत्रकार दिन सोहळ्याचे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्राला पत्रकारांचा एक वेगळा वारसा लाभलेला आहे. आणिबाणीच्या काळात पत्रकारांनी घेतलेल्या भूमिका महत्वपुर्ण होत्या, या पत्रकारांचा वारसा वेगवेगळ्या माध्यमातून आजही जिवंत आहे. पनवेल मिडिया प्रेस क्लबने पत्रकारदिनानिमित्त साधून करोनाच्या संकटात समाजाला साथ देणाऱ्या समाजसेवकांचा सत्कार केला, कर्तृत्वानांचा सत्कार करणे ही आपली संस्कृती आहे ही संस्कृती जपण्याचा काम पनवेल मिडिया प्रेस क्लबने केले आहे, असे उदगार विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी व्यक्त केले.

पनवेलमधील सुरूची हॉटेलच्या सभागृहात सोमवारी झालेल्या कार्यक्रमात करोनाच्या संकटकाळात समाजातील गरजूंना मदत केलेल्या व्यक्ती आणि संस्थांचा सत्कार करण्यात आला. विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, कॉग्रेस नेते महेंद्र घरत, शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल मिडिया प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश कोळी आदी उपस्थित होते. पत्रकार दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात दरेकर यांनी सध्याच्या पत्रकारितेवर भाष्य करताना सध्या पत्रकारांची मुस्कटदाबी होत असल्याचे मत व्यक्त केले. आणिबाणीच्या काळात ज्याप्रमाणे पत्रकारांची मुस्कटदाबी करण्यात आली, त्याप्रमाणे सध्या काही प्रमाणात परिस्थिती असल्याचे भाष्य केले. पत्रकार सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम करतात, त्यामुळे पत्रकारांना ताकद देवून पत्रकारांच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे कौतुक करताना सांगितले की मी रायगडच्या मातीतला माणूस म्हणून या कार्यक्रमाचे मला विशेष कौतुक आहे. पत्रकारांनी आयोजित केलेला हा कार्यक्रम समाजाला दिशा देणारा आहे, नव्या पिढीला प्रोत्साहन देणारा, प्रेरणा देणारा कार्यक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले की पत्रकार हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते, मात्र केवळ आरसा न राहता समाजाला दिशा देण्याचा कार्यक्रम पत्रकार करीत आहेत. पत्रकारांना टाकलेल्या चांगल्या पाऊलावर पाऊल टाकत समाजाने कर्तृत्वाला सलाम या कार्यक्रमाचे अनुकरण केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. रामशेठ ठाकूर यांनी कर्तृत्वानांचा सत्कार करीत असताना तुम्ही समाजात केलेल्या कामामुळे आपण सगळे मिळून करोनावर मात करू शकलो, नागरिकांनी प्रत्येकाची जबाबदारी ओळखून प्रत्येकाने काम केले, प्रत्येकाने सुरक्षितता बाळगल्यामुळे राज्यातच नव्हे तर देशात करोनावर मात करू शकलो. महानगरप्रमुख रामदास शेवाळे आणि डॉ. गिरीश गुणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात पनवेल महापालिकेच्या स्मशानभूमीत काम करणारे कर्मचारी, सामाजिक संस्था, डॉ. गिरीश गुणे, डॉ. नागनाथ यमप्पल्ले, डॉ. साजिद खान, डॉ. आरिफ दाखवे, डॉ. अरूणा पोहरे, दिपक सिंग, श्री. भगवती साई संस्थान, सचिन दुंदरेकर, शिवसहाय्य संस्था पनवेल, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, एकता सामाजिक संस्था आदींचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

१०० टक्के घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा करणारा उरण तालुका ठरला राज्यात पहिला

दै.रायगड नगरी । अलिबाग

प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबावणी करण्यात येत असून जिल्ह्यातील उरण तालुक्यात १०० टक्के घरांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. विशेष म्हणजे १०० टक्के घरांना नळाने पाणी पुरवठा करणारा उरण तालुका राज्यात प्रथम ठरला आहे. २०२०-२१ या आर्थिक वर्षात उरण तालुक्यात नळ कनेक्शन जोडणीच्या उद्दिष्टांच्या २३८.१० टक्के काम करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. या अंतर्गत २०२४ पर्यंत प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.या योजनेच्या माध्यमातून सुरुवातीला ज्या घरांमध्ये नळ कनेक्शन आहे, त्या घरांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ज्या घरांमध्ये वैयक्तिक नळ कनेक्शन नाही अशा घरांना नळ कनेक्शन देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात उल्लेखनीय काम करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.पी. वेंगुर्लेकर, उरण पंचायत समिती गट विकास अधिकारी नीलम गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी- कर्मचाऱ्यांनी योग्य नियोजन केल्याने उरण तालुका राज्यात १०० टक्के घरांना नळ कनेक्शन देणारा पहिला तालुका ठरला आहे.जलजीवन मिशन यशस्वी करण्यासाठी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांच्यासह सर्व जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी, कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले. जलजीवन मिशन अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात घरा-घरात नळ कनेक्शन देण्यात येणार असून, उरण तालुक्यातील सर्व घरांमध्ये नळ कनेक्शन देण्यात आले आहे. या तालुक्यात जर कुणी नव्याने घर बांधले असेल किंवा एखादे कुटूंब कामानिमित्त तालुक्यात नव्याने स्थलांतरित असेल तर अशा कुटुंबांनी प्रशासनासोबत संपर्क साधून नळ कनेक्शन मागणी करावी, तसेच उरण व्यतिरिक्त जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यात ज्या कुटुंबाला वैयक्तिक नळ कनेक्शन नाही त्या कुटुंबांना नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. उरण तालुका नळ कनेक्शन दृष्टीक्षेप:- एकूण कुटुंबे : ३६ हजार १०८, एप्रिल २०२० पूर्वी नळ कनेक्शन असलेली कुटुंबे : २६ हजार ९६२, २०२०-२१ मधील उद्दिष्ट : ३ हजार ८४१, २०२०-२१ मध्ये नव्याने जोडलेले नळ कनेक्शन : ९ हजार १४६, एकूण टक्केवारी : २३८.१०. जिल्ह्यात तालुक्यानुसार कुटुंबांकडे असलेली नळ कनेक्शन (टक्केवारी) उरण : १०० टक्के, म्हसळा : ८८.४० टक्के,खालापूर : ७८.२८ टक्के, पनवेल : ७८.७७ टक्के, कर्जत : ६०.०५ टक्के, माणगाव : ७४.५७ टक्के, रोहा : ६८.३७ टक्के, महाड : ६९.५५ टक्के, पोलादपूर : ६५.८६ टक्के, मुरुड : ५६.१७ टक्के, अलिबाग : ५६.९३ टक्के, श्रीवर्धन : ८६.८५ टक्के, तळा : ६३.०३ टक्के, सुधागड : ४९.६२ टक्के, पेण : ४४.८७ टक्के एकूण : ६८.७९ टक्के.

ट्रेलरच्या धडकेने १ ठार २ जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

भरधाव ट्रेलरने वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करून दिलेल्या धडकेत १ ठार तर २ जखमी झाल्याची घटना व्हेलवेट हॉटेलच्या पुढे कोळखे गावाच्या कमानीसमोर घडली आहे.

ट्रेलर क्र.एमएच-४६-एच-५७६१ वरील चालक हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर घेवून भरधाव वेगाने जात असताना त्याने मुज्जमील अब्दुल रौफ बहेना उर्फ पाचू (२२), यास्मिन शामीम अन्सारी (२२) व दिपाली विटमल (२९) यांना धडक दिल्याने झालेल्या अपघातात दिपाली विटमल या गंभीररित्या जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला आहे.

तर इतर दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

उत्तर रायगड जिल्हा विविध आघाड्यांची नियुक्ती जाहीर

दै.रायगड नगरी । पनवेल

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी जिल्ह्यातील विविध आघाडींच्या नियुक्ती जाहीर केल्या आहेत.

त्यानुसार भाजप उत्तर रायगड जिल्हा ज्येष्ठ कार्यकर्ता सेलच्या संयोजकपदी सी. सी. भगत, सहकार सेलच्या जिल्हा संयोजकपदी कुंडलिक काटकर, प्रज्ञा प्रकोष्ठ जिल्हा संयोजकपदी डॉ. मयुरेश जोशी, सांस्कृतिक सेल जिल्हा संयोजकपदी अभिषेक पटवर्धन, कायदा सेलच्या जिल्हा संयोजकपदी ऍड. विशाल डोंगरे आणि झोपडपट्टी सेल जिल्हा संयोजकपदी राहुल वाहुळकर यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

प्रथम राष्ट्र, नंतर संघटन आणि त्यानंतर स्वतः, अशी देशहिताची विचारसरणी असलेला भारतीय जनता पक्ष आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्ता तळागाळातील घटकांचा विचार करून काम करीत असतात. जिल्हा आघाडीच्या विविध समित्यांमध्ये नियुक्त करण्यात आलेले प्रमुख आपापल्या क्षेत्रात चांगल्याप्रमाणे कार्यरत असून त्यांच्यावर पक्षामार्फत दिलेली जबाबदारी ते यशस्-वीपणे पार पाडतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या नियुक्तीच्या निमित्ताने व्यक्त केला आहे.

घरफोडीत हजारो रुपये किंमतीचा ऐवज लंपास

दै.रायगड नगरी । पनवेल

राहत्या घराचे दरवाजाचे कडीकोयंडा कोणत्या तरी हत्याराने उघडून घरात प्रवेश करून घरातील सोन्या चांदीचे दागिने व इतर ऐवज असा मिळून ८३ हजाराचा मुद्देमाल पळवून नेल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

भगवंता पावळे रा.पुष्पगंधा सोसायटी प्लॉट नं.३६ यांच्या घरात दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या घरातील मुख्य दरवाजाचा कडीकोयंडा कोणत्या तरी हत्याराने उपसून घरात प्रवेश करून घरातील सोन्या चांदीचे दागिने रोख रक्कम असा मिळून जवळपास ८३ हजाराचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार कामेठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कासु-गडब विभागात पाणी टंचाई

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील कासु - गडब विभागातील सर्वच गावांना गेले काही महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली आहे प्रत्येक गावातील महिला एक ते दोन किलोमीटर आंतर मिळेल तसे पिण्याचे पाणी आणत आहेत. महिलांचा तर पूर्ण दिवस पाणी आणण्यास जात आहे.या बाबत येथील जनतेने आक्रमक भुमिका घेवुन त्वरीत येथील पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी येथील जनतेने केली आहे.

या विभागासाठी जेडब्ल्यू कंपनीचे पाईप मधुन गेले तीस वर्षापासून पाणी मिळत आहेत मात्र ही पाईपलाईन जीर्ण झाल्याने काही ठिकाणी तुटलेली आहे परिणामी या भागातील लोकांना पाईप लाईन मधून पाणी पोहोचत नाही.तर कंपणीने येथील जनतेला पाणी पुरवठा करण्यासाठी दुसरी पाईप लाईन टाकली आहे परंतु या पाईप लाईनवरुन पाणी पुरवठा होत नसल्याने येथील जनतेला भिषण पाणी पुरवठ्याच्या समसेला सामोरे जावे लागत आहे. येथील पाणी प्रश्ना संदर्भात पेण येथील उपविभागिय कार्यालयात आमदार रंविद्र पाटील यांचे उपस्थित बैठक घेण्यात आली या बैठकीला उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार, तहसिलदार अरुणा जाधव, गटविकास अधिकारी सी. पी. पाटील, जेएसडब्लु कंपनीचे महाव्यवस्थापक जनसंर्पक बळवंत जोग, पाणी पुरवठ्याचे अधिकारी, जिल्हापरिषदेचे माजी विरोधी पक्ष नेते वैकुंठ पाटील, माजी जिल्हापरिषद सदस्य गजानन बोरकर,वडखळ सरपंच राजेश मोकल, दिनेश म्हात्रे, संदिप कडु, संदिप म्हात्रे आदिसह विभागातील सरपंच ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत जेएसडब्लुची जुनी पाईप लाईन त्वरीतदुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरळीत करावा, नविन पाईप लाईन लवकरात लवकर सुरु करावी , जिवन प्राधिकरणाची योजना सुरु करावी, तातडीने टॅकरव्दारे या भागातील गांवाना पाणी पुरवठा करण्याच्या सुचना आमदार रंविद्र पाटील यांनी उपस्थित अधिका-यांना दिल्या.

> जेएसडब्लु कंपनीची जुनी पाईप लाईन दुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल, तर नविन पाईप लाईन लवकरच सुरु करण्यात येणार
> **बळवंत जोगः महाव्यवस्थापक जनसंपर्क जेएसडब्लु कंपनी**

पनवेल तालुक्यातील पोसरी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सुनिता शिद व त्यांचे पती कमलाकर शिद यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. त्यांचे पक्षात स्वागत करताना तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सोबत युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, सुनिल माळी, डॉ. अविनाश गाताडे, शिवाजी माळी, भालचंद्र म्हसकर, संतोष म्हात्रे, बंडू शिद, दत्ता म्हसकर आदी उपस्थित होते.

बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते शिवसाहिज मल्टीस्पेसिएलिटी हॉस्पिटलचे उदघाटन

दै.रायगड नगरी । पनवेल

करंजाडे येथील नवीन बांधण्यात आलेल्या शिवशाहीज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चा लोकार्पण सोहळा बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी बोलतांना करंजाडे मधील नागरिकांना शिवशाहीज मल्टीस्पेशालिटी च्या मार्फत चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत आणि त्यांनी डॉ वेलहारे यांचे कौतूक केलं की लहान वयात त्यांनी खूप प्रगती केली व त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. या वेळी इतर मान्यवर उपस्थित होते.

पुई येथे ज्ञानामृत ग्रंथालयाचे उद्घाटन

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रैहे तालुक्यातील पुई या गावी संपूर्ण ग्रामस्थांच्या सहयोगाने ज्ञानाम्रुत ग्रंथालयाची स्थापना करून उद्घाटन सोहळा नववर्षाच्या प्रारंभी करण्यात आला आहे. शास्त्रास्य विद्ये प्रतिपत्तये या सुभाषिताच्या अर्थाने वाचन संस्कृतीचे महत्त्व वाढावे, तसेच वाचन संस्कृती जोपासली जावे त्याचप्रमाणे प्रत्येकाने वाचनाचा छंद जोपासावा या अनुषंगाने ग्रा.पं.हद्दीतील पुई या गावामध्ये ज्ञानाम्रुत ग्रंथालय, वाचनालय व व्रुत्तपत्र वाचनालय सुरू करण्यात आले आहे. या ग्रंथालयाचा शानदार उद्घाटन सोहळा ग्रा.पं.सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामसेवक, पोलिस पाटील, गाव कमिटीचे पदाधिकारी, अंगणवाडी व आशा सेविका, संपूर्ण ग्रामस्थ, महिला व तरुण वर्गाच्या उपस्थितीत पार पाडण्यात आला.

हुंडाई गाडीसह २ लाख ८९ हजार रुपये किंमतीचा

प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखू व पानमसाला गुटखा कामोठे पोलिसांनी केला हस्तगत

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या सुगंधीत तंबाखू व पानमसाला गुटखा या अन्न पदार्थाची वाहतूक व विक्रीसाठी प्रतिबंधीत असतानाही बेकायदेशीररित्या मानवी शरिरास घातक व लोकजिवीतास धोका निर्माण करणारे प्रतिबंधीत अन्न पदार्थाची वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने हुंडाई गाडी घेवून कामोठे परिसरात फिरत असताना पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात जवळपास २ लाख ८९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून या प्रकरणी एकाला ताब्यात घेतले आहे.

कामोठे वसाहत परिसरात अशा प्रकारचा प्रतिबंधीत माल घेवून हुंडाई कंपनीची गाडी क्र.एमएच-४३-आर-१८८९ वरुन काही इसम फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम जगदाळे, सहा.पो.निरीक्षक नाजुकाताई पाटील व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी राजू शहा (३३ रा.रोडपाली) याला ताब्यात घेतले आहे. तर त्याचा सहकारी ओमकार गुप्ता हा पसार झाला आहे. या गुन्ह्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सहा.पो. नि.नाजूकाताई पाटील करीत आहेत.